# * मतदार यादी बाबत महत्वाच्या सुचना *

- मतदार यादी तयार करताना राज्य निवडणूक आयोगाने दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी अस्तित्वात असलेली मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत आदेश दिलेले आहे.

- संगणकप्रणालीव्दारे मतदार यादी तयार करण्याकरिता कंट्रोल चार्ट तयार करत असताना https://११५.१२४.९६.१२७/ या URL वर उपलब्ध असणारा **मदररोलच** ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्यामुळे कंट्रोल चार्ट तयार करत असताना सदर सॉफ्टवेअर मधीलच मदररोलचा उपयोग करून कंट्रोल चार्ट तयार करण्यात यावे ( असे न झाल्यास चुकीची मतदार यादी तयार होईल ) व ते अपलोड करण्यात यावे.

- आयोगाकडून प्राप्त झालेल्या आयडी व पासवर्डचा उपयोग करून मदररोल या मेनु मधून आपल्या महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत येत असलेल्या / आपल्याला आवश्यक असलेलेच ( पोट निवडणूक असेल तर फक्त संबंधित वॉर्ड / प्रभागात येणारे ) **विधान सभा मतदार संघाचा यादी भाग क्रमांक** ( Part Number ) फक्त प्रोसेस करून डाउनलोड करण्यात यावे.

  ( उदा- विधान सभा क्रमांक ५ ते ८ व ७५ ते ८१ असेल तर तेवढेच प्रोसेस करून डाउनलोड करावे. )

- आवश्यकता नसल्यास संपुर्ण विधान सभा मतदार संघामधील सर्व यादी भाग क्रमांकाचा ( Part Number ) मदररोल प्रोसेस करू नये. अन्यथा प्रोसेस पुर्ण होण्यासाठी खुप वेळ लागु शकतो व आपली पुढील प्रक्रियेस विलंब होउ शकतो.

- मदररोल एकदाच प्रोसेस करण्यात यावा.

- तसेच मदररोल नुसार **प्रारूप मतदार यादीसाठी** कंट्रोल चार्ट तयार करून अचुकपणेच अपलोड करण्यात यावे. ( जर चुकीचा कंट्रोल चार्ट अपलोड झाले असेल तर त्यामधील डेटा हा बॅकऐन्ड ( Back End ) ला सेव्ह होतो व तो डेटा आपल्या स्तरावरून डिलीट होणार

नाही, तसेच त्यावर सुधारीत कंट्रोल चार्ट अपलोड केले असता आधीचा चुकीचा डेटा व सुधारीत डेटा एकत्र होउन मतदार यादी तयार होते व ती चुकीची असणार आहे)

- जर प्रारूप मतदार यादीसाठी चुकीचा कंट्रोल चार्ट अपलोड केला गेला असेल तर तो डिलीट करण्याकरिता तात्काळ आयोगास आपल्या संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्या सहीने पत्र देवून कळविण्यात यावे.